मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास
(विशेष संदर्भ : नांदेड व औरंगाबाद जिल्हा)

१.० प्रस्तावना :-

देशातील एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के स्त्री लोकसंख्येचे प्रमाण आहे, परंतु देशाच्या विकासासाठी महिलांचा असलेला सहभाग मात्र अतिअल्प प्रमाणामध्ये आहे. महिला सहकारी बँकेच्या स्थापनेमुळे देशाच्या एकूण विकासासाठी महिलांचा सहभाग करून घेण्यात येऊ लागला आहे. त्यामुळे महिला उद्योजगता निर्माण होत आहे.

नागरी सहकारी बँकांनी महिला उद्योजकतेसाठी पुरेसा कर्ज पुरवठा न दिल्यामुळे महिला सहकारी बँका या नागरी महिला सहकारी बँका म्हणून उदयास आल्या. महिला सहकारी बँक स्थापनेचा मुख्य उद्देश म्हणजे महिला या आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या पाहिजेत हा आहे.

नागरी सहकारी बँकेच्या इतिहासात महिला सहकारी बँक उदयास येणे म्हणजे भारतातील सहकारी बँक क्षेत्रात क्रांतीकारी बदल म्हणावा लागेल.

भारतीय राज्यघटनेनुसार महिलांना सामाजिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य देण्यात आले आहे. परंतु सामाजिक स्तरावर कार्य किंवा महिलांची उन्नती करण्यासाठी सामाजिक रूढी परंपरेनुसार त्यांना आजही आवश्यक प्रमाणात आर्थिक व राजकीय प्रक्रियेत स्वातंत्र्य दिले जात नाही.

जर महिलांना भारतीय राज्यघटनेनुसार आर्थिक, सामाजिक प्रक्रियेत स्वातंत्र्य देण्यात आले तर महिलांचा विकास होण्यास विलंब लागणार नाही. त्यामुळे महिला सहकारी बँक चळवळ महाराष्ट्रात सुरु करण्यात आली. सध्या महाराष्ट्रात २४ महिला सहकारी बँका आहेत. त्याचबरोबर देशभर अशा प्रकारच्या महिला सहकारी बँका उदयास येऊ लागल्या आहेत.

मराठवाड्यातील सर्व महिला सहकारी बँकांच्या कार्यप्रणालीच्या संदर्भानुसार या बँका विविध प्रकारचे कर्ज उपलब्ध करुन देवून महिलांचा आर्थिक व सामाजिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न करतात असे दिसून आले. प्रामुख्याने या बँका विविध प्रकारचे कर्ज उपलब्ध करुन

देतात. त्यामध्ये कॅश क्रेडिट, हाऊसिंग कर्ज, छोटे उद्योगधंदे कर्ज, मुदत ठेव कर्ज, पिग्मी ठेव कर्ज, पगार कर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज, चालू खाते कर्ज इत्यादी प्रकारचे कर्ज मराठवाड्यातील महिला सहकारी बँका उपलब्ध करुन देतात.

भारतीय सहकारी संघटना यांच्या प्रयत्नाने राष्ट्रीय सहकारी परिषद २१ एप्रिल १९८७ ला नवी दिल्ली येथे भरविण्यात आली होती.

भारतातील सर्व राज्य व केंद्रशासीत प्रदेशात मिळून महिला सहकारी बँकांची एकूण संख्या ८७ एवढी आहे. तर महाराष्ट्रात २८ बँका कार्यरत आहेत. भारतात एकूण महिला सहकारी बँकांचे ३२.१८% एवढे प्रमाण आहे, तर मराठवाड्यात ०६ महिला सहकारी बँका अस्तित्वात आहेत. त्यामध्ये आदर्श महिला सहकारी बँक लि. औरंगाबाद, इंदिरा महिला नागरी सहकारी बँक लि. लातूर, जयकालीमाता महिला अर्बन सहकारी बँक लि. वसमतनगर जि.हिंगोली, प्रियदर्शनी महिला नागरी सहकारी बँक लि. बीड, शिवपार्वती महिला नागरी सहकारी बँक लि. परभणी, दि भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक लि. नांदेड या बँकांचा समावेश आहे.

२.० संशोधनाची आवश्यकता :-

भारतात सहकारी चळवळीचा प्रारंभ सहकारी पत पुरवठा संस्था स्थापनेने सन १९०४ मध्ये झाला तेव्हापासून भारतात सहकारी बँकांची प्रगती होत आहे. सध्या भारतात विविध गटातील लोकांच्या पतविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी विविध प्रकारच्या सहकारी बँका / पत पुरवठा संस्था अस्तित्वात आल्या आहेत. प्रामुख्याने स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी चळवळीला प्रोत्साहन मिळाल्यामुळे सहकारी बँकेची प्रगती जलद झाली आहे.

१९९५ मध्ये मानवी विकास अहवालात स्त्रियांच्या प्रश्नांची सखोल चर्चा करण्यात आली आहे. जगात कोणत्याही देशात स्त्रियांना पुरुषांबरोबर संधी मिळत नाही. त्यामुळे विकासासाठी त्यांचे योगदान असूनही त्यांचा मानवी विकास झाला नाही. विशेषतः विकसनशील व मागास देशामध्ये याची तीव्रता जास्त आहे.

१९९५ च्या मानवी विकास अहवालात नमुद केल्याप्रमाणे भारत हा देश मानवी विकासात जागतिक पातळीवर १३४ व्या क्रमांकावर आहे. लोकसंख्येतील स्त्री-पुरूष समानता

आणण्यामध्ये भारत सरकारला अपयश आले आहे. लोकसंख्येतील प्रत्येक घटकाला वैयक्तिक वर्तन, सामाजिक व आर्थिक व्यवहारात निर्णय घेण्याचे समान स्वातंत्र्य असेल तेव्हाच खऱ्या अर्थाने मानवी विकास साधले जाऊ शकतील या पार्श्वभूमीवर भारत सरकारने २००१ हे वर्ष **'महिला सशक्तीकरण वर्ष'** म्हणून घोषित केले आहे. आर्थिक विकासात स्त्रियांना महत्त्वाचे स्थान दिले आहे.

महिला सहकारी बँक स्थापन करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे गरजू, गरीब महिलांच्या लहान-मोठ्या अडचणी समुह सहभागाने सोडविणे, सर्वांसाठी एकाने व एकासाठी सर्वांनी धडपड करणे, महिलांचा सर्वांगीण दर्जा उंचावणे, महिलांचा आत्मविश्वास वाढविणे आदी उद्देश विशद करता येतील.

आर्थिक प्रक्रियांमध्ये महिलांचा सहभाग वाढल्यास देशाचे दारिद्र्य कमी होण्यास महिला सहकारी बँका ह्या महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतील, या पार्श्वभूमीवर **'मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास' विशेष संदर्भ : नांदेड व औरंगाबाद जिल्हा** या विषयाची निवड केली आहे.

महाराष्ट्रात महिला सहकारी बँकांची एकूण संख्या २८ आहे. त्यापैकी मराठवाड्यात सहकारी तत्त्वावर आधारीत असलेल्या महिला सहकारी बँका या नांदेड, लातूर, औरंगाबाद, जालना, बीड इत्यादी जिल्ह्यांमध्ये शाखा व उपशाखांचे जाळे मोठ्या प्रमाणामध्ये पसरलेले आहे. या महिला सहकारी बँकेचा स्थापनेचा वेग वाढू लागला आहे. त्यामुळे मला सहकारी बँकांचा सखोल अभ्यास करण्याची गरज भासू लागली आहे. मराठवाड्यात पहिली महिला सहकारी तत्त्वावरील बँक म्हणजे नांदेड जिल्ह्यातील **'भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक'** होय. या बँकेची स्थापना १९८३ साली झाली तर औरंगाबाद जिल्ह्यातील आदर्श सहकारी महिला बँकेची स्थापना १९९८ ला झालेली आहे. म्हणून **'मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास' विशेष संदर्भ : नांदेड व औरंगाबाद जिल्हा** करण्यासाठी पीएच.डी. साठी ह्या विषयाची निवड केली आहे. या संशोधनाचा लाभ मराठवाड्यातील महिला सहकारी बँकेच्या विकासासाठी होईल असे वाटते.

३.० संशोधनाचे महत्त्व :-

आतापर्यंत नागरी सहकारी बँक व कृषि सहकारी बँक यांच्या कार्यप्रणालीवर मोठ्या प्रमाणात अभ्यास करण्यात आला आहे. परंतु महिला सहकारी बँकेच्या कार्यप्रणालीवर मराठवाड्यात आतापर्यंत अभ्यास झालेला नाही. मानवी समाजाचा ५०% हिस्सा असलेल्या महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणाचा अभ्यास करणे नितांत गरजेचे वाटते. त्यामुळेच तरी **'मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास'** या माध्यमाने मराठवाड्यातील महिला सहकारी बँकेच्या विकासासाठी लाभ होईल अशी आशा आहे.

मराठवाड्यातील महिला सहकारी बँकेच्या कार्यप्रणालीची उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे अभ्यास करण्याचे ठरविले आहे. या अभ्यासामध्ये सभासदांचे स्वरुप, महिला सहकारी तत्त्वावर बँक उभारणीसाठी मराठवाड्यात पोषक वातावरण आहे किंवा नाही, संचालक मंडळ, कर्मचारी नियुक्ती, आर्थिक स्थिती, बँक व्यवहार, कार्यप्रणाली, कार्य प्रणातील अडथळे या सर्वांचा अभ्यास करून मराठवाड्यातील महिला सहकारी बँकेची कार्यक्षमता कशी वाढविता येईल हे अभ्यासाअंती संक्षिप्त रुपात स्पष्ट होईल आणि योग्य त्या शिफारशी मांडण्यात येतील.

४.० संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

(१) महिला सहकारी बँकेच्या व्यवस्थापन व कार्य पध्दतीचा अभ्यास करणे.

(२) कर्ज देवाण-घेवाण, आर्थिक व्यवहार व कर्ज वसूली याचे मोजमाप.

(३) महिला सहकारी बँके द्वारे गोळा केलेल्या ठेवीचा अभ्यास करणे.

(४) महिला सहकारी बँके मार्फत ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या विविध सेवांचा अभ्यास करणे.

(५) महिला सहकारी बँकेच्या विकासाचा आढावा घेणे.

(६) महिला सहकारी बँकेच्या मुलभूत सुविधा व बँकेत्तर सुविधांबाबत अभ्यास करणे.

५.० संशोधनाची गृहितके :-

(१) मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांचा आवश्यक प्रमाणात विकास झाला नाही.

(२) महिला सहकारी बँका आधुनिक सुविधा करू शकत नाहीत.

(३) महिलांच्या सबलीकरणासाठी महिला सहकारी बँकांचा हातभार लागत आहे.

(४) महिला सहकारी बँकेमुळे महिला उद्योजकास व बचत गटास कर्ज पुरवठा करण्यात आलेला आहे.

६.० संशोधन पध्दती :-

निवडलेल्या अभ्यास पध्दतीत प्राथमिक माहिती व दुय्यम माहितीच्या आधारावर हे संशोधन आधारलेले आहे. त्याचबरोबर महिला सहकारी बँकेचा वार्षिक अहवाल हे मुख्य माहितीचे साधन आहे, त्याचबरोबर कर्मचारी वर्गाची भेट, चेअरमन, संचालक मंडळाची भेट घेऊन त्यांच्या माध्यमातून मिळालेल्या उपयुक्त माहितीच्या आधारे व मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांचे वार्षिक अहवाल, सांख्यिकीय माहिती व इतर लेखी माहिती, विषयाची व्याप्ती लक्षात घेऊन महिला सहकारी बँकांची निवड केलेली आहे. या संशोधनामध्ये नमुना निवड पध्दती व त्याचबरोबर माहितीच्या आधारे व सांख्यकीय माहितीच्या आधारे हे संशोधन आधारीत आहे व लाभार्थी महिलांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन माहिती गोळा करुन हे संशोधन पूर्ण करण्यात येईल.

७.० संशोधनाची व्याप्ती :-

'मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांच्या आर्थिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास' विशेष संदर्भ : नांदेड जिल्ह्यातील दि भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक लि. नांदेड व औरंगाबाद जिल्ह्यातील आदर्श महिला सहकारी बँक लि. औरंगाबाद या दोन जिल्ह्यातील महिला बँकेचा संदर्भीय अभ्यासासाठी निवड करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत संशोधन मराठवाड्यातील नांदेड आणि औरंगाबाद जिल्ह्यापूरतेच मर्यादित आहे.

महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी व सर्वांगीण विकासासाठी महिला सहकारी बँका भारतीय रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार कार्य करीत असतात. त्यामध्ये व्यवसायासाठी कर्ज देणे, वाहन खरेदीसाठी कर्ज देणे, गाय खरेदी, खावटी कर्ज, संगणक खरेदी तसेच शैक्षणिक, मुलांच्या लग्न कार्यासाठी व इतर कारणासाठी महिला सहकारी बँका कर्जाची उपलब्धता करून देतात. नांदेड जिल्ह्यात भाग्यलक्ष्मी महिला सहकारी बँक तर औरंगाबाद जिल्ह्यात आदर्श महिला सहकारी बँक औरंगाबाद येथे कार्यरत आहेत.

महिला सहकारी बँका ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगार मिळवून देऊन ग्रामीण भागाचा उत्कर्ष साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात महिला सहकारी बँका कार्यरत आहेत.

८.० प्रकरणांची रूपरेषा :-

(१) प्रस्तावना.

(२) संशोधन साहित्याचा आढावा / मागोवा.

(३) मराठवाड्यातील महिला सहकारी बँकेची स्थिती.

(४) मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांची वित्तीय स्थिती.

(५) मराठवाड्यातील महिला सहकारी बँकांच्या विकासाचा मागोवा.

(६) महिला सहकारी बँका आणि विकासाची तुलनात्मक प्रवृत्ती.

(७) निष्कर्ष व शिफारशी.

निवडक संदर्भ सूची :-

(१)	सहकार तत्त्वे / व्यवहार	रायखेलकर / डांगे
(२)	नांदेड जिल्ह्यातील महिला सहकारी बँकेचा एक अभ्यास	प्रा.एन.व्ही.कांबळे
(३)	मराठवाड्यातील विविध महिला सहकारी बँकेचा वार्षिक अहवाल.	
(४)	ग्रामीण अर्थव्यवस्था व सहकार	मोहन सराफ
(५)	अर्थबोध	२००२
(६)	मराठवाडा अर्थशास्त्र परिषदेमधील शोध निबंध -	
	महिला स्वयंसहाय्यता बचत गटाचे कार्य व भूमिका	विजयकुमार वावळे
(७)	योजना सप्टेंबर २००२	
	स्त्री साक्षरता विकासासाठी आवश्यक व उपकारक	ज.श.आपटे
(८)	भारतीय व्यापारी व औद्योगिक कायदे	डॉ.विनायक द.पेठारकर

संशोधक मार्गदर्शक

(प्रा.डॉ.के.एस. बाभूळगावकर)
अर्थशास्त्र विभाग
योगानंद महाविद्यालय, वसमतनगर
जिल्हा हिंगोली.

संशोधक विद्यार्थी

(प्रा.एन.व्ही. कांबळे)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
वसंतराव नाईक महाविद्यालय,
वसरणी, नांदेड.